नि.फौ.ख.क्र.३७/२०२३

सरकार -वि- राजु **नि.क्र.१५**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः—

माझे नाव — सुखदास रूधाजी तलवारे

वय. ६० वर्षे, व्यवसाय — मजुरी, राह.— खापा, तुमसर ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील.</u>**

माझेसमक्ष कोणतीही घटना घडलेली नाही. माझेसमक्ष कोणतीही कार्यवाही झाली नाही परंतु रस्त्यावर उभा असतांना पोलिसांनी माझ्या सह्या घेतल्या होत्या. आता मला अभिलेखावरील सुचनापत्र, घटनास्थळप पंचनामा व जप्ती पंचनामे दाखविण्यात आले. त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सह्यांना अनुकमे **निशाणी १६ ते १८** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षाच्या प्रकरणास दुजोरा देत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येत आहे.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २३.०१.२०२३ रोजी पोलिसांनी मला पंच म्हणुन हजर राहण्यासाठी सुचनापत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी पोलिसांसोबत गांधी वार्ड खापा येथील आरोपीच्या राहत्या घरी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, एका छोट्या डबकीमध्ये जळलेल्या तणसाची राख जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होवु नये म्हणुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पारधी यांनी नाकारला.</u>** **फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/— | स्वा/— |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. १६.१२.२०२५ | दि.१६.१२.२०२५ |